जा.क्र. का.15/परिपत्रक/मुंबई शहर/सू.क्र.17/ 1025
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1,
दिनांक : 12/11/2018

**परिपत्रक :-**

**विषय :- मुंबई शहरासाठीची मार्गदर्शक सूचना क्र. 17 स्थूल जमिनीचे मूल्यांकनाबाबत.**

मुंबई शहरासाठीची सुधारित विकास नियंत्रण नियमावली शासनाने मंजूर केली असून, ती दि. 13/11/2018 पासून अंमलात येणार आहे. सदर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार, संपूर्ण भूखंड क्षेत्रावर चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणार आहे. तथापि, मनोरंजनात्मक खुली जागा सोडणे बंधनकारक असल्याने, विकासावर येणारी मर्यादा विचारात घेऊन, स्थूल जमिनीच्या मूल्यांकनाबाबत, मुंबई शहरासाठीच्या मार्गदर्शक सूचना क्र. 17 मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

**17. स्थूल जमिनीचे मूल्यांकन -**

अ) भूखंडाचे क्षेत्र 1000 चौ.मी. पर्यंत असल्यास, पूर्ण दराने मूल्यांकन करण्यात यावे.

ब) भूखंडाचे क्षेत्र 1001 चौ.मी. ते 2500 चौ.मी. पर्यंत असल्यास, वार्षिक मूल्यदर तक्त्यातील जमीन दराचे 95% दराने मूल्यांकन करण्यात यावे.

क) भूखंडाचे क्षेत्र 2501 चौ.मी. ते 10000 चौ.मी. पर्यंत असल्यास वार्षिक मूल्यदर तक्त्यातील जमीन दराचे 90% दराने मूल्यांकन करण्यातयावे.

ड) भूखंडाचे क्षेत्र 10001 चौ.मी. व त्यापेक्षा जास्त असल्यास, वार्षिक मूल्यदर तक्त्यातील जमीन दराचे 85% दराने मूल्यांकन करण्यात यावे.

सदर परिपत्रक दि.13/11/2018 पासून अंमलात येईल.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशने या सदराखाली परिपत्रके / मिळकत मूल्यांकन याठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी सादर :-
1) मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग, मंत्रालय मुंबई-32
2) मा. महालेखापाल (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :-

3) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई

/- सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्याच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

4) सह नोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

5) उपसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, मुंबई प्रदेश, मुंबई.

6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.

7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (संगणक), पुणे.

/- सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक मुंबई

/- सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्याच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

10) श्रीमती निलीमा देसाई, NIC, पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.